जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2022
तरुण भारत


# डॉ. डी. वाय. पाटील यांचा आज सन्मान

## शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात प्राचार्य कणबरकर पुरस्काराचे होणार वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा राष्ट्रीय 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना आज, बुधवार (दि. १३) रोजी शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. दुपारी ४ वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होईल. १ लाख ५१ हजार रूपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत.

डॉ. डी. वाय. पाटील यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९३५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील अंबपमध्ये झाला. त्यांनी



एम. ए., एल. एल. बी., पीएच. डी., पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे. शिवाजी विद्यापीठाने त्यांना २०१५ मध्ये डी. लिट. पदवीने सन्मानित केले आहे. तसेच डॉ. पाटील यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील कार्यातून शिक्षण आणि आरोग्य सेवेसाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. डॉ. वाय. पाटील यांनी के. जी. टू पी. जी. पर्यंत शिक्षण सर्वसामान्यांना मिळावे म्हणून १७२ पेक्षा जास्त शैक्षणिक संस्थांची स्थापना केली आहे. पुणे, मुंबई आणि कोल्हापुरातील अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी शिक्षण संस्थांमधून अनेक सर्वसामान्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळाले. त्याचबरोबर श्रीराम सहकारी संस्था, महापालिका, जिल्हा मार्केट, राज्य विद्युत मंडळ, देवस्थान समिती, नाट्य परिषद आदी राजकीय, सहकार क्षेत्रातील संस्थांचे नेतृत्व केले आहे. त्यांनी त्रिपुरा, बिहार, पश्चिम बंगालचे राज्यपाल जबाबदारी सांभाळली होती. त्यांच्या या अतुलनीय कार्याबद्दल त्यांना प्राचार्य कणबरकर पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती आहे.

### पुरस्काराची निर्मिती

माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी विद्यापीठास २५ लाखांच्या ठेवीसाठी धनादेश प्रदान केला. हा पुरस्कार देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा तसेच अन्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला देण्याचे ठरले आहे. १९८० ते ८३ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून ते कार्यरत होते. त्यांच्या कालावधीत अनेक विभागांची नव्याने निर्मिती झाली आहे.

लोकमत

# डी. वाय. पाटील यांचा आज सन्मान

## रा. कृ. कणबरकर पुरस्काराचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे



त्रिपुरा, बिहारचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांना यावर्षीच्या 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर' या राष्ट्रीय पुरस्काराने आज, बुधवारी सन्मानित करण्यात येणार आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी चार वाजता शाहू छत्रपती यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित असतील. विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराच्या निर्मितीकरिता त्यांच्या कुटुंबीयांनी विद्यापीठाला २५ लाख रुपयांची ठेव सुपूर्द केली. त्यातून विद्यापीठाने सन २०१४ मध्ये प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराची निर्मिती केली. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षण क्षेत्रात माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांनी नवे शैक्षणिक प्रमाण निर्माण केले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासह गरजूंच्या शिक्षणाला बळ देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. या कार्याची दखल घेऊन या कणबरकर पुरस्कारासाठी त्यांची निवड एकमताने झाली. या पुरस्काराचे स्वरूप एक लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे आहे.

पुढारी

# कार्यकर्त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास केला पाहिजे

## प्राचार्य डॉ. हरिश भालेराव यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



आंबेडकरी विचाराने प्रेरित झालेली सामाजिक व राजकीय चळवळ ही मानवमुक्तीची चळवळ आहे. त्यांचा राजकीय लोकशाहीचा विचार अंगीकारून चळवळीला योग्य दिशा देणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा कार्यकर्त्यांनी अभ्यास केला पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरिश भालेराव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित, फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह अंतर्गत राजर्षी शाहू महाराज स्मृती गोलमेज परिषदेत ते बोलत होते. दलितमित्र व्यंकाप्पा भोसले, प्रा. विनय कांबळे, दगडू भास्कर, बाबासाहेब वडगावकर, प्रा. जी. बी. आंबेडकर, प्रा. अशोक चोकाककर, प्रा. आण्णासाहेब कांबळे, दिगंबर लोहार, डॉ. शरद गायकवाड, नामदेवराव कांबळे यांनी संघटनेची वाटचाल, चळवळी संदर्भातील भूमिका व दिशा स्पष्ट करण्यासाठी चर्चेच्या दोन फेऱ्यांमध्ये मांडणी केली.

प्रास्ताविक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दीपा श्रावस्ती यांनी केले. प्रा. अविनाश भाले यांनी आभार मानले.

पुढारी

# एम.फिल., पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा २५ पासून सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोंबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील एम.फिल., पीएच.डी. कोर्स अभ्यासक्रम परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया सुरू आहे. अधिविभाग व महाविद्यालय स्तरावर २५ एप्रिल ते १५ मे याकालावधीत ऑफलाईन पद्धतीने या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

विद्यापीठाकडून सर्व विद्या शाखांची एम.फिल., पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा वर्षातून एकवेळा घेण्यात येते. तथापि, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा पद्धतीत बदल करण्यात आला आहे. विद्यापीठाने नुकतेच परीक्षा अर्ज व परीक्षा प्रारंभच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार १२ एप्रिलपर्यंत विनाविलंब अर्ज करता येणार आहेत.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले यांना अभिवादन

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठात महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते म. फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अजित चौगुले, डॉ. आर. के. कामत, डॉ. एम. एस. देशमुख, अभय जायभाये, डॉ. अवनिश पाटील, डॉ. तृप्ती करेकट्टी, उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2022

# डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास करा : डॉ. भालेराव

## शिवाजी विद्यापीठात शाहू महाराज स्मृती गोलमेज परिषद

कोल्हापूर,ता. १२ : 'आंबेडकरी विचाराने प्रेरित झालेली सामाजिक आणि राजकीय चळवळ ही मानवमुक्तीची चळवळ आहे, त्यांचा राजकीय लोकशाहीचा विचार अंगीकारून चळवळीला योग्य दिशा देणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा कार्यकर्त्यांनी अभ्यास केला पाहिजे,' असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरिश भालेराव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे झालेल्या फुले शाहू आंबेडकर सप्ताहांतर्गत राजर्षी शाहू महाराज स्मृती गोलमेज परिषद परिषदेत ते बोलत होते. ही परिषद आंबेडकरी विचाराने प्रेरित सामाजिक व राजकीय चळवळी यावर व्याख्यान आयोजित केले.

व्यंकाप्पा भोसले, प्रा. विनय कांबळे, दगडू भास्कर, बाबासाहेब वडगावकर, प्रा.जी. बी. आंबेडकर, प्रा. अशोक चोकाककर, प्रा. आण्णासो कांबळे, दिगंबर लोहार,

डॉ. शरद गायकवाड, नामदेव कांबळे, डॉ. विनोद पवार, प्रमोद कदम, डी. एस. डोने, बाळासाहेब मोमीन यांनी संघटनेची वाटचाल, चळवळी संदर्भातील भूमिका व दिशा स्पष्ट करण्यासाठी चर्चेच्या दोन फेऱ्यामध्ये मांडणी केली. प्रा. डॉ श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. प्रा अविनाश भाले यांनी आभार मानले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी सूत्रसंचालन केले.